Vol 2 Issue 12 jan 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 12, Jan. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# संतपरंपरा व संतांची अभंगरचना

भारती रेवडकर,

मराठी विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग, पीएच.डी.संशोधन केंद्र,
श्री.शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

**सारांश :**

भारतीय संस्कृतीत संतांच्या परंपरेचा जबरदस्त प्रभाव मानवी मनावर आहे. विविध प्रदेशातील संतांनी आपापल्या प्रदेशात आपल्या कार्याचा, कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. संत हे संत होते. तसेच त्यांच्यातील प्रतिभाशक्तीमुळे त्यांनी आपली साहित्यनिर्मिती ही समाजाचे भान ठेवून केली. समाजसेवक या नात्याने त्यांनी आपली साहित्यनिर्मिती करुन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. समाजपरिवर्तन, उदबोधन, विकास यासाठी त्यांनी आपले कवित्व समाजासमोर अभंग, ओव्या, स्फुट रचना या रुपाने आणले. त्यांनी अध्यात्म, काव्य, तत्वज्ञान यांची सांगड आपल्या साहित्यातून घातली. भक्तीबरोबर समाजात दया, क्षमा, शांती, बंधुत्व या दैवी गुणांना रुजविण्याचा प्रयत्न आपल्या साध्या, सोप्या, रसाळ भाषेतून केला. परमार्थाबरोबर नेटका प्रपंच करण्याचा व्यवहारी उपदेशही त्यांनी दिला. परमेश्वराचे नामस्मरण करावे हा सुलभ भक्तीमार्ग त्यांनी समाजाला सांगितला. काळाच्या ओघाप्रमाणे त्या त्या समाजावर विपरित परिणाम होत होते. सगळीकडे अज्ञानाचा अंधार पसरला होता. दैन्य, दारिद्रय, अंधश्रध्दा यांच्या विळख्यात समाज सापडला होता. अशावेळी संतांनी आपल्या रसाळ वाणीने समाजपरिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. अनेक संतांनी त्यासाठी लोकोपवाद सहन केला. समाजाकडून होणारा छळ सहन करुन आपले इप्सित कार्य पूर्ण केले म्हणूनच आज सर्व समाज संतांचे ऋण मानते आहे. समाजातील विविध धर्माच्या लोकांनी या संतांच्या कृतीकडे, त्यांच्या साहित्याकडे डोळसपणे पाहून त्यांचे ऋण मानले आहे असे म्हणावेसे वाटते.

**प्रास्ताविक :–**

महाराष्ट्रातील विविध धर्मातील विविध संतांनी आपल्या कर्तृत्वाने प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनात एक वेगळीच आदराची भावना निर्माण केली आहे. मराठी भाषेतील रसाळ वाणीने प्रत्येक महाराष्ट्रीयालाच या संतांनी जिंकले आहे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतांनी आपल्या विशाल कर्तृत्वाने मराठीची किर्ती पसरवून जनजागृतीचे महान कार्य केले आहे. तसेच आपल्यामागे आपल्या शिष्यांच्या रुपाने संतांची प्रभावळ निर्माण केली आहे.

ज्ञानेश्वरांच्या काळात तर हिंदूधर्म खिळखिळा झालेला होता. स्वराज्यामुळे स्वधर्म टिकून होता पण त्याचे पहिले तेज नाहिसे झाले होते. धर्माच्या अंतरंगाचा विसर पडून त्याच्या बाहयांगावरच सर्वांची दृष्टी खिळून राहिलेली होती. कर्मठपणा वाढला होता. देवदैवते, व्रत–वैकल्य, मंत्र–तंत्र, अंधश्रध्दा इ.चा सुकाळ होता. याचवेळी विकृत अवस्थेला पोहचलेल्या समाजाला ज्ञानेश्वरांनी सुमार्गावर आणून सोडले. हे कार्य करीत असताना प्रतिगाम्यांनी अनेक मार्गांनी ज्ञानेश्वरांचा व त्यांच्या कुटुंबियांचा छळ केला पण ज्ञानेश्वर ''हे विश्वचि माझे ऐसी मती जयाची स्थिर किंबहूना चराचर। आपणचि जाहला।अशा कोटीला जावून पोहचले होते म्हणूनच सामान्यातील सामान्य माणूस संत होवू शकतो असे प्रतिपादन ज्ञानेश्वरांनी केले. ज्ञानेश्वरांनी सांगितलेला भक्ती मार्ग समतेचा व बंधुत्वाचा पुरस्कार करणारा होता म्हणून या भक्तीपंथाची एक प्रभावळ निर्माण झाली. नामदेव शिंपी, नरहरी सोनार, सेना न्हावी, एकनाथ, गोरा कुंभार, सावता माळी, तुकाराम, चोखामेळा, बंका महार, दासीजनी, वारांगणा कान्होपात्रा वगैरे सर्व थरातील ही माणसे संत कोटीला जावून पोहचली.

ज्ञानेश्वर व नामदेव यांनी भक्ती मार्गाचा प्रत्यय आणून दिला. ज्ञानदेवांच्या भक्तीची बैठक व्यापक स्वरुपाची होती.

Title :संतपरंपरा व संतांची अभंगरचना
Source:Indian Streams Research Journal [2230-7850] भारती रेवडकर, yr:2013 vol:2 iss:12

त्यांची सर्व नाती परमेश्वरामध्ये केंद्रीत झालेली होती. महाराष्ट्राला ज्ञानेश्वरांनी भक्तीमहिमा दिला तर नामदेवांनी नाममहिमा दिला. भक्ती ही कर्म, ज्ञान आणि योग हयापेक्षा श्रेष्ठ आहे. हया श्रेष्ठ भक्तीचे साधन म्हणजे नाममहिमा हे नामदेवांनी पटवून दिले. ज्ञानेश्वर, नामदेव इ. संतांच्या कार्याचा कालखंड हा राजकीय दृष्टया चैतन्यहीन होता. परंतु तो भक्तीच्या दृष्टीने अंत्यंत बहरलेला दिसून येतो.

''नाचू कीर्तनाच्या रंगी ज्ञानदीप लावू जगी''

असे म्हणून नामदेवांनी भक्तीसंप्रदायाची पताका मोठया डौलाने आपल्या खांदयावर घेवून कीर्तन, भजनाचा सहज सुलभ मार्ग समाजाला दाखविला.

एकनाथ हे थोर संत आपल्यासमोर कवी, तत्वज्ञ, प्रपंच लोकसेवक, पुराणिक, कीर्तनकार इ. विविध रुपांनी उभे राहतात. त्यांनी समाजाला परमार्थाचा अर्थ सांगितला. भारुडाच्या रुपाने त्यांनी परामार्थाबरोबर समतेची व मानवतेची शिकवण समाजाला दिली. त्यांनी आपल्या साहित्याव्दारे समाज जागृतीचे कार्य केले.

तुकाराम महाराजांनी त्यांच्या अभंग वाणीतून सर्व समाजाला मानवतेचा, प्रेमाचा आणि ज्ञानाचा संदेश दिला. सामाजिक अन्यायाविरुध्द त्यांनी आवाज उठविला. रंजल्या गांजलेल्यांना आपले मानले. दया, क्षमा, शांती, बंधुता या मानवी मुल्यांचा पुरस्कार केला म्हणूनच त्यांच्या भागवत धर्माच्या कार्याचा उल्लेख करताना ''तुका झालासे कळस'' असे म्हंटले जाते.

समर्थ रामदासांच्या वेळचा महाराष्ट्र तर पारतंत्र्याच्या अंधारात खितपत पडलेला होता. दुष्काळ, रोगराईमुळे समाज त्रस्त झाला होता. अन्यायाने, अत्याचाराने सगळीकडे धुमाकूळ घातला होता. धार्मिक,सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्राचा अधःपात झालेला होता. अशा बिकट परिस्थितीत समर्थ रामदासांनी आपले कार्य करुन जनतेला एक नवा मार्ग दाखविला.

संत परंपरेतील वाङ.मयाचे संस्कार संत तुकाविप्रांवर असल्यामुळे त्यांची परंपराही संत परंपरा आहे. त्यांचा मनःपिंड त्याचप्रमाणे घडत गेला तो ज्ञानेश्वर, नामदेव विशेषताः तुकाराम यांच्या वाङमयाप्रमाणे घडत गेला. या सर्व संतांचे संस्कारतुकाविप्रांवर होणे अपरिहार्य होते. महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि वाङमयीन जगात अभंगवाणीला महत्वाचे स्थान आहे.

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम किंवा इतर कोणत्याही संतांच्या वाणीतून प्रकट झालेल्या अनुभूतीचे तटस्थ वृत्तीने मोजमाप करणे अवघड काम आहे. कोणत्या प्रसंगी, कोणत्या भावाचे नेमके प्रकटीकरण आहे हे समजणेकठीण आहे. परमात्म्याची अनुभवप्रचीती गुढ व दिव्य आहे. ती जशीच्या तशी शब्दात पकडता येत नाही. जे काही थोडेसे शब्दातून व्यक्त होते त्यावरुन त्या अभंगांची वर्गवारी करावी लागते. ज्या क्रमाने अभंग निर्मितीझाली तो क्रम सहसा हाती लागत नाही. कारण अभंग रचना ही स्फुट रचना वेगवेगळया भावावस्थेचा आविष्कार असते.

सर्व संतांच्या संस्कारांचा प्रभाव संत तुकाविप्रांच्या अभंगवाणीतही उमटलेला दिसतो. कारण या संताप्रमाणेच तुकाविप्रांच्या अभंग वाणीतही भक्ती, ज्ञान, धर्म, निती, व्यवहार इ.विषयीच्या मौलिक विचारांचेच प्रतिबिंब इथे उमटलेले असले तरी येथे हेही लक्षात येते की सादापेक्षा पडसादच अधिक जाणवत राहतात. छोटया छोटया शब्दांतून मोठा आशय व्यक्त करण्याच्या गुणांमुळे आणि मनाची पकड घेणाऱ्या वेधक कथेमुळे तुकाविप्रांचे अभंग लोकप्रिय ठरतात यात नवल नाही.

संतांची अभंगरचना ही विविध विषयांविषयी व्यक्त झालेली दिसते. त्यांच्या रचनेतून त्यात्याक्षणी त्यांना वाटणारे सहजस्फुर्त अविष्काराच व्यक्त होताना दिसतात. ''ज्ञानेश्वर हे क्रांतदर्शी महाकवी आहेत. त्यामुळे कोणत्याही वस्तूंच्या आरपार ते पाहू शकतात. ज्ञानेश्वरीत प्रतीत होणारे ज्ञानदेव गीतेचे भाष्यकार आहेत. आत्मतत्वांचा वेध घेणारे एक व्युत्पन्न पंडित आहेत. तत्वचिंतक आहेत. गुरुभक्त आहेत. श्रोत्यांची आस्था बाळगणारे वक्ते आहेत. ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाला विश्वात्मक अधिष्ठान आहे.''ज्ञानेश्वरांच्या अभंगरचनेचे वर्गीकरण करताना पुढीलप्रमाणे वर्गवारी स्थुलमानाने लक्षात येईल. मंगलाचरण व गणेशवंदन, श्रीगुरुगौरव, सगुण निर्गुणरुपपर, हरिपाठ, नामसंकिर्तनमाहात्म्य, संतमहिमा, पंढरीचा विठ्ठल, बालक्रिडा व श्रीकृष्णवर्णन, गौळणी–विरहिणी, विठ्ठलप्रसादाने प्राप्त झालेली स्थिती, बुध्दिरुपी सखीशी संवाद, प्रेमकलह व करुणा, ब्रम्हज्ञान–माहात्म्य, श्रीगुरुनिवृत्ती व श्रीज्ञानदेव यांचा संवाद, आत्मसाक्षात्कार, योगपर अभंगमाला, विविध उपदेश, मदालसा, विविध रुपके, देवापाशी मागणे इ. अर्थातच हे वर्गीकरण स्थुलमानानेच समजायचे. कारण एखादा अभंग या वर्गातून त्या वर्गात सहज घालता येण्यासारखा सापडेल. या वर्गीकरणांवरुन ज्ञानेश्वरांच्या अभंगातील विषयांची विविधताही नजरेत भरते.

### *नामदेवांची अभंगरचना लक्षात घेतली तर त्यामध्ये आत्मचरित्रपर*

अभंग, ज्ञानेश्वरचरित्रपर अभंग, बाळक्रीडेचे अभंग दिसतील. नामदेवांच्या आत्मचरित्ररुप अभंगात त्यांचे त्रोटक आत्मचरित्र आलेले दिसते. त्यांच्या जीवनातील प्रमुख अशा चार प्रसंगांचे निवेदन त्यात असून नामदेवांच्या भावभेडयाभक्तीला केलेला विरोध ज्ञानेश्वरादिकांसमोर प्रगट झालेला त्यांचा अहंकार, ''अंतरीचा कोरा.''राहिल्यामुळे गुरुकडे झालेली रवानगी, त्याचे दर्शन आणि शेवटी शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा असे प्रमुख प्रसंग उत्कटपणे व तितक्याच निःसंकोचपणे नामदेवांनी येथे मांडले आहे. हे अभंग म्हणजे मराठी कवितेतील आत्माविष्काराची पहिली प्रसादचिन्हे म्हणता येतील. नामदेवांच्या ज्ञानेश्वरचरित्रपर अभंगात तीर्थावळी, समाधी व आदि ही प्रकरणे दिसतात.

नामदेवांना ज्ञानेश्वरांविषयी वाटणारा आदर व प्रीती या अभंगातून व्यक्त होते. बाळक्रींडेच्या अभंगात नामदेवांना कृष्णजीवनातील बालपणापासून ते यौवनावस्थेपर्यंतचे विविध प्रसंग टिपले आहेत.

तुकारामांच्या अभंगरचनेचा विचार करताना विठ्ठलाचे रुप, त्याविषयी मनास वाटणारा जिव्हाळा, संतसमागम, नामसंकिर्तन, भेटीची आतूरता, मीलनाचे सुख, अशा विविध छटा व्यक्त होताना दिसतात. त्यांच्या अभंगातून ईश्वरविषयक अनुभूतीच्या विविध छंटांचे दर्शन तर घडतेच शिवाय त्यामध्ये उपदेशपरही भाग येतो. त्यांना प्राप्त झालेले वैराग्य, त्यांनी भाकलेली विठ्ठलाची करुणा, त्यांचे देवावर रुसणे, त्यांचा देवाशी झालेला प्रेमकलह, त्यांनी देवापाशी धरलेला लडीवाळ हट्ट, त्यांचे कधी कधी एकेरीवर येणे इ. सर्व छटा त्यांच्या अनेक अभंगातून अनुभवास येतात. नामस्मरण किर्तन, पंढरीमहिमा, संतसंगत, उपदेश, कर्मकांडविरोध असे अनेक विषय त्यांच्या अभंगात येतात.

या सर्व संतांच्या परंपरेतीलच संत तुकाविप्र असल्यामुळे या संतांच्या अभंगवाणीचा उत्कट आविष्कार आपल्याला प्रत्ययास येतो. त्याचप्रमाणे संत तुकाविप्रांच्या अभंगवाणीतूनही आपल्याला त्यांच्या अंतःकरणातील भक्तिचा उत्कट आविष्कार प्रत्ययास येतो. संत तुकाविप्रांनी विपूल अशी अभंगरचना करुन आपल्या मनातील, अंतःकरणातील, ह्रदयातील भावभावनांना अगदी मुक्तपणे प्रकट केले आहे. त्यांनी मनातील सर्व भावभावनांचे अगदी सामर्थ्यशाली प्रकटीकरण आपल्या अभंगातून केले आहे. भक्तिचा विचार अगदी साध्या सोप्या मार्गाने करुन त्याची महती त्यांनी अभंगातून गायली आहे. हरिनामाचा गजर करुन हरिनामाला किती महत्व आहे हे त्यांनी आपल्या अभंगरचनेतून जनसामान्यांना पटविण्याचा प्रयत्न केला आहे.

***निष्कर्षः—***

आजच्या या धावपळीच्या, ताणतणावाच्या जगात संसाराचा अनुभव घेताना दुःखालाच जास्तवेळा सामोरे जावे लागते. अशावेळी आपली मनोवृत्ती ताब्यात ठेवण्यासाठी भक्तिमार्ग हा अत्यंत सुलभ आहे. भक्तिमार्गाव्दारे, परमेश्वराच्या नामस्मरणाव्दारे आत्मीक उन्नती साधता येते हे संतांनी आपल्याला त्यांच्या साहित्यातून पटवून दिले आहे. अगदी प्राचीन काळातील संतांच्या साहित्याचा पगडा आजही आपल्या मनाला म्हणूनच सुख समाधान देऊन जातो. मनाला या साहित्याच्या चिंतनामुळे, अभ्यासामुळे शांती मिळते. संतांच्या विचारातून आपले जीवन संपन्न कसे बनवावे याचे मार्गदर्शन लाभते. सन्मार्गी, सदाचारी जीवनासाठी संतांच्या व्यापक आणि विश्वात्मक वृत्ती आपल्याला मदत करतात. अनेक अडीअडचणीच्या प्रसंगी आपले रक्षण करतात.

***संदर्भ ग्रंथः—***

1.देशपांडे, अ.ना., प्राचीन मराठी वाङःमयाच्या इतिहास (भाग—1पूर्वार्ध), व्हीनस प्रकाशन, पुणे.
2.नसिराबादकर, ल.रा., प्राचीन मराठी वाङःमयांचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर.
3.शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङःमयाचे स्वरुप, प्रसाद प्रकाशन, पुणे.
4.बोरगावकर रविंद्र, प्राचीन मराठी चरित्र वाङःमय.
5.तुकाविप्रांची प्रकाशित कविता.
6.तुकाविप्रांची अप्रकाशित कविता.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net